**फौजदारी चौकशी अर्ज क्र. ०१/२०१८ (CNR No. : MHRG10-000005-2018) मधील निशाणी क्रमांक १ वरील आदेश**

अर्जदार श्रीमती श्रध्दा श्रीहरी यादव यांनी त्यांचे पती कै. श्रीहरी महादेव यादव यांच्या मृत्युची नोंद संबधित कार्यालयाकडे होणेबाबत निर्देश करणेबाबत अर्ज केला आहे.

२. अर्जदाराने त्यांच्या अर्जात असे कथन केले की, त्यांचे पती कै. श्रीहरी महादेव यादव यांचा मृत्यू दिनांक २९.११.२०१३ रोजी सरेकर आळी, महाड, ता. महाड, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या मृत्यूची नोंद अनवधनाने राहून गेली आहे. सबब त्यांच्या मृत्यूची नोंद महाड नगरपरिषद, महाड, ता. महाड, जि. रायगड यांच्या कार्यालयातील जन्म—मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये करणेस संबंधित अधिकारी यांना निर्देष देणेबाबत विनंती केली आहे.

३. अर्जदाराने अर्जाच्या पृष्ठयर्थ अर्जदाराचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (निशाणी क्र. १०) दाखल केले आहे. तसेच अर्जदाराने त्यांच्या आधार कार्ड, शिधापत्रीका इ. साक्षांकित प्रत सादर केले आहे. मुख्याधिकारी, महाड नगरपरिषद, महाड यांनी दिलेले मृत्यू नोंदवही अनुअपलब्धता प्रमाणपत्र, अर्जदाराने तिचे मयत पती यांच्या मतदार ओळखपत्राची साक्षांकित प्रत व दैनिक सागर मध्ये दिनांक १६.०२.२०१८ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसीची प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. सामनेवाला हे नोटीसची बाजवणी होवूनही सुनावणीकामी गैरहजर राहिल्याने त्यांच्याविरुध्द एकतर्फा—सुनावणीचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

४. अर्जदाराच्या वकीलांचे म्हणणे ऐकले. अर्ज व त्यासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदाराने सादर

केलेल्या प्रतिज्ञापत्रावरुन असे स्पष्ट होते की, अर्जदार यांचे पती कै. श्रीहरी महादेव यादव यांचा मृत्यू दिनांक २९.११.२०१३ रोजी सरेकर आळी, महाड, ता. महाड, जि. रायगड येथे झाला आहे. सदर प्रतिज्ञापत्रावर विसंबून अर्जदाराच्या पतीच्या मृत्यूची नोंद घेणे योग्य होईल.

सबब अर्जदाराचा अर्ज मंजूर करून खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मुख्याधिकारी, महाड नगरपरिषद, महाड, ता. महाड, जि. रायगड यांना असे निर्देष देण्यात येतात की, त्यांनी कै. श्रीहरी महादेव यादव यांचा मृत्यू दिनांक २९.११.२०१३ रोजी रोजी झाल्याबाबतची नोंद योग्य ते शुल्क घेवून त्यांच्या दप्तरी करावी.

महाड
दि. १६.०७.२०१८

(आर. आर. पाटील)
न्यायादंडाधिकारी, प्रथम वर्ग, महाड